जिल्हा न्यायालय, ठाणे यांच्या आस्थापनेवरील अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

शासन निर्णय क्रमांक: अस्थायी ०२१९/प्र.क्र.५०/कार्यासन-११

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०७ मार्च, २०१९.

पहा: १. शासन निर्णय वित्त विभाग क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१,वित्तीय सुधारणा,दि.१०.९.२००१.

२. शासन निर्णय क्र.अस्थायी ०३१८/४४६/प्र.क्र.७४/कार्यासन ११,दि.२९.९.२०१८.

३. शासन निर्णय वित्त विभाग क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.दि.२१.२.२०१९.

४. जिल्हा न्यायालय, ठाणे यांचे पत्र No.Estt.(con)/४०९/२०१९,दि.९.१.२०१९.

शासन निर्णय :

जिल्हा न्यायालय, ठाणे या आस्थापनेवरील १५६ अस्थायी पदांना संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये दि. १.१०.२०१८ ते दि.२८.२.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. जिल्हा न्यायालय, ठाणे यांनी संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये विनंती केल्यानुसार त्यांच्या आस्थापनेवरील पुढील तक्यात नमूद केलेली १५६ अस्थायी पदे दि.१.३.२०१९ ते दि. ३०.९.२०१९ पर्यंतच्या कालावधीत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	पदांची संख्या
१	अधीक्षक	२
२	सहायक अधीक्षक	९
३	लघुलेखक (उ.श्रेणी)	१
४	लघुलेखक (नि.श्रेणी)	११
५	वरिष्ठ लिपीक	२३
६	कनिष्ठ लिपीक	६६
७	मुख्य बेलिफ	३
८	बेलिफ	१५
९	हवालदार	१
१०	शिपाई	१६
११	पहारेकरी	४
१२	वाहन चालक	२
१३	इंग्रजी लेखनिक	१
१४	पुस्तक बांधणीकार	१
१४	सफाईगार	१
	एकूण पदे	१५६

३. यासाठी होणारा खर्च जिल्हा न्यायालय, ठाणे या कार्यालयासाठी मागणी क्र.जे-१,२०१४,न्यायदान,दिवाणी व सत्र न्यायालये, (०२) जिल्हा व सत्र न्यायाधीश, (०२)(०१) जिल्हा व सत्र न्यायाधीश (अनिवार्य)(२०१४ ०१७२) ०१, वेतन या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षात मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दि.२१.०२.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०८१२०२२३६५१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Santosh Sampatti Navagire

Digitally signed by Santosh Sampatti Navagire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=214b4345a2842afe7dd0cbda9e8d83579cbedaaaef30f215ceda096e4e407797, serialNumber=0cb1b0de020015cf6d1f800579271f4816460b1802c2ae247dd6dd6f47462cd3, cn=Santosh Sampatti Navagire
Date: 2019.03.08 12:05:42 +05'30'

(सं.सं.नवगिरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
२) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, ठाणे.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
४) महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
६) वित्त विभाग, व्यय-५ / आ.पु.क.कक्ष /अर्थसंकल्प ११,मंत्रालय, मुंबई.
७) विधी व न्याय विभाग, कार्या-२०/कार्या-२३,मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती (कार्यासन ११)